माहे जानेवारी २०२५ ते माहे डिसेंबर २०२५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित तसेच मागील निवडणुकांमध्ये चुकीची प्रभागरचना झाल्यामुळे निवडणूका न होऊ शकलेल्या ग्रामपंचायतींच्या **सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम..**

सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२४/प्र.क्र. ०५ /का-८,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०३/०३/२०२५.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
(मुंबई व मुंबई शहर वगळून) .

विषय - माहे जानेवारी २०२५ ते माहे डिसेंबर २०२५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित तसेच मागील निवडणुकांमध्ये चुकीची प्रभागरचना झाल्यामुळे निवडणूका न होऊ शकलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नव्याने आरक्षण सोडतीचा कार्यक्रम..

संदर्भ - १. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. ३०/०९/२०२४ चे पत्र
२. शासन आदेश क्र. ग्रापंनि २०२४/प्र.क्र.१४२/पं.रा.-२, दिनांक २७/११/२०२४ व दिनांक १७/०२/२०२५ चे पत्र

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतींच्या मुदत संपण्यापूर्वी निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२२, दिनांक ११ मार्च, २०२२ च्या सुधारणेन्वये "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट कलम (१) मधील, खंड (ब) मधील "राज्य निवडणूक आयोग" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या मजकुराऐवजी, "राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने राज्य शासन" हा मजकूर दाखल करण्यात येईल." अशी दुरुस्ती करण्यात आली आहे. या सुधारणेन्वये "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट कलम (१) मधील, खंड (ब) मधील (प्रभाग रचना व सदस्य संख्या निश्चित करणे) राज्य शासनाचे अधिकार दिनांक १७/०१/२०२३ च्या आदेशान्वये संबधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत.

त्यामुळे शासनाकडून दिनांक २७/११/२०२४ च्या आदेशान्वये राज्यातील माहे जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम देण्यात आला. या कार्यक्रमानुसार राज्यातील सुमारे ८९ ग्रामपंचायतींची प्रभाग रचना पूर्ण झाल्याचे शासनाने दिनांक १७/०२/२०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयामधील विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ मध्ये दि. १२ जुलै, २०२२ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करण्याकरिता गठीत केलेल्या समर्पित मागासवर्ग आयोगाने आवश्यक त्या बाबींची पूर्तता करुन दि. ७ जुलै, २०२२ रोजी आपला अहवाल शासनास सादर केल्याची बाब शासनाने अर्ज क्र. ९२६९५/२०२२ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजीच्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाने यापुढील निवडणुकांमध्ये समर्पित मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन पुढील निवडणुका घेण्याबाबत आदेश दिले आहेत. **समर्पित मागासवर्ग आयोगाच्या शिफारशीनुसार प्रत्येक ग्रामपंचायतीला त्याच्या एकूण जागांपैकी नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता शिफारस केलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता देय होतील.**

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजी दिलेल्या उपरोक्त आदेशास अनुसरुन **ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवण्याच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे प्रभाग रचना पूर्ण झालेल्या ग्रामपंचायतींपैकी ज्या ग्रामपंचायती समर्पित आयोगाच्या अहवालात दिसत नसतील, त्या बाबतीत शासनाकडून उचित कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० (२)नुसार अनु. जाती, अनु.जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि महिलांसाठी जागा आरक्षित करण्याचे अधिकार आयोगाने दिनांक २७ जानेवारी, १९९५ च्या आदेशानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत.

त्यामुळे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० अ(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन **मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन** राहून प्रभाग रचना पूर्ण झालेल्या ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम राबविण्यासाठी आदेशित करण्यात येत आहे.

## आदेश

१. ग्रामपंचायतींच्या सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असल्याने, त्यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेऊन निवडणुका योग्यप्रकारे पार पाडाव्यात.

२. समर्पित मागासवर्ग आयोगाच्या शिफारशीनुसार प्रत्येक ग्रामपंचायतीला त्याच्या एकूण जागांपैकी नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता शिफारस केलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता देय होतील. मात्र महाराष्ट्र अधिनियम क्र. १९/२०२२, दिनांक ०१/०२/२०२२ नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग चे एकूण आरक्षण हे पंचायतीमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही. ”

३. ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण ) आदेश २०२१, दिनांक २४/११/२०२१ मध्ये प्रभाग रचना व आरक्षण करण्याची सविस्तर कार्यपध्दती नमूद केलेली आहे. नागरिकांच्या मागसवर्ग प्रवर्गाच्या जागा निश्चित करण्यासाठी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण ) सुधारणा आदेश २०२२, दिनांक २२/०७/२०२२ अन्वये कार्यपध्दती नमूद केलेली आहे.

४. उक्त आदेशानुसार आरक्षणाची सोडत काढण्याची प्रक्रिया राबविण्यात यावी.

५. आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ नुसार पार पाडण्यात यावा.

६. दिनांक २४/११/२०२१ च्या आदेशातील मुद्दा क्र. ९ नुसार पंचायतीच्या एकूण जागांच्या ५० % जागा महिलांकरीता आरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

७. आयोगाच्या दि. २४/११/२०२१ च्या मूळ आदेशासोबतच्या परिशिष्ट ६ अ (बिगर अनुसूचित/ अंशत: अनुसूचित क्षेत्रासाठी) मध्ये दिनांक २२/०७/२०२२ च्या आदेशासोबतच्या परिशिष्ट १ नुसार अंशत: सुधारणा करण्यात आली आहे.

८. दि. २४/११/२०२१ च्या मूळ आदेशातील परिशिष्ट ६ ब ( संपुर्णत: अनुसूचित क्षेत्रासाठी) मधील अ.क्र. ७ नुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी एकही जागा आरक्षित होणार नाही. तसेच या आदेशातील परिशिष्ट ११ नुसार ग्रामपंचायत आरक्षणाचे संपूर्ण विवरणपत्र तयार करण्यात यावे. परिशिष्ट १३ नुसार प्रारुप प्रभाग रचना व परिशिष्ट १६ नुसार अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात यावी.

९. प्रारुप अधिसूचना व अनुसूची यास व्यापक प्रसिध्दी देण्याची जबाबदारी सबंधित तहसिलदार यांची असेल.

१०. विशेष ग्रामसभेत आरक्षण सोडतीअंती आरक्षणावर हरकती व सूचना मागविण्यात याव्यात. प्राप्त हरकती विचारात घेऊन उपविभागीय अधिकारी यांनी अभिप्राय द्यावेत. उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन जिल्हाधिकारी यांनी **अंतिम** अधिसूचनेस मान्यता द्यावी.

११. अंतिम अधिसूचना व अनुसूची यास व्यापक प्रसिध्दी देण्याची जबाबदारी सबंधित तहसिलदार यांची असेल.

१२. उक्त कार्यक्रमानुसार प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करावा.

उक्त सर्व आदेशातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार तसेच इतर संबंधितांनी घ्यावी.

१३. सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** नुसार प्रभागाच्या आरक्षणाचा कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला

(राजेंद्र पाटील)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र - परिशिष्ट अ

प्रती - १. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन.

**उक्त कालावधीतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात अनुदानाची पर्याप्त तरतूद (मागील अनुदानाच्या थकबाकीसह) करण्याबाबत आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी. तसेच या पत्रात निर्देश दिल्यानुसार ग्रामसेवकासह संबंधित गटविकास अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जिल्हा परिषद यांची सक्रिय भूमिका व जबाबदारी राहील, याबाबतचे निर्देश देणारे पत्र आपणाकडून तातडीने निर्गमित करण्यात यावे.**

**तसेच प्रभाग रचना पूर्ण झालेल्या ग्रामपंचायतींपैकी ज्या ग्रामपंचायती समर्पित आयोगाच्या अहवालात दिसत नसतील, त्या बाबतीत शासनाकडून उचित कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.**

२. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.
३. विभागीय आयुक्त (सर्व),
४. **जिल्हाधिकारी सर्व (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)**
५. **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)**
६. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.
७. सर्व निवडणूक कार्यासने
८. निवड नस्ती.

## परिशिष्ट अ

## ग्रामपंचायत आरक्षण सोडतीचा कार्यक्रम

| आरक्षणाची सोडत | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|
| i) विशेष ग्रामसभेची सूचना देणे ( आरक्षणाची सोडत काढण्याकरीता ) | ०६/०३/२०२५ |
| ii) विशेष ग्रामसभा बोलवून, तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली, आरक्षणाची सोडत काढणे ( अनु. जाती महिला, अनु.जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग , नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला) | ११/०३/२०२५ |
| iii) प्रभागनिहाय आरक्षण प्रारुप अधिसूचनेला ( नमुना ब ) मा.जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे | १२/०३/२०२५ |
| iv) प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करणे | १२/०३/२०२५ |
| v) प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | १२/०३/२०२५ ते १९/०३/२०२५ |
| vi) उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देणे | २१/०३/२०२५ |
| vii) उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन अंतिम अधिसूचनेस (नमुना अ) मा. जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे | २४/०३/२०२५ |
| viii) जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ) व्यापक प्रसिध्दी देणे | २४/०३/२०२५ |

( राजेंद्र पाटील )
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र